निलंबन कालावधीत मुख्यालय बदलणे-
त्यासंबंधीची कार्यपद्धती

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : सीडीआर-१००८/प्र.क्र.२ /०८/११,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ मार्च, २००८.

परिपत्रक :-

एखाद्या शासकीय सेवकास निलंबित करण्याचा आदेश देण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, निलंबन कालावधीमध्ये अशा सेवकाचे मुख्यालय बदलू शकतो किंवा कसे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या प्रश्नाची तपासणी करण्यात आली आणि त्यासंबंधी काढलेला निष्कर्ष, पुढील परिच्छेदामध्ये नमूद केलेला आहे.

२. निलंबनाधीन असलेला शासकीय सेवक हा, सर्वसाधारणपणे शासकीय कर्मचा-यांना लागू असलेल्या सेवेच्या इतर सर्व शर्तीच्या अधीन असल्याचे समजण्यात आले असल्याने, तो पुर्व परवानगीशिवाय मुख्यालय सोडू शकत नाही. अशाप्रकारे एखाद्या शासकीय सेवकाचे मुख्यालय, हे त्याचे कर्तव्याचे अखेरचे ठिकाण असल्याचे समजण्यात येते. तथापि, निलंबनाधीन असलेल्या एखाद्या व्यक्तीने त्याचे मुख्यालय बदलण्याची विनंती केली असेल तेव्हा, अशा बदलामुळे शासनास, प्रवास भत्ता, इत्यादींसारखा कोणताही जादा खर्च करावा लागणार नाही किंवा अन्य कोणतीही गुंतागुंत होणार नाही याबाबत सक्षम प्राधिका-याची खात्री पटली तर, मुख्यालय बदलण्यास सक्षम अधिका-याची कोणतीही हरकत असणार नाही.

३. मंत्रालयातील सर्व विभागांनी, वरील बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

४. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashrata. gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००८०३१९१७३२४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(का.तु.सातकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
निवड नस्ती.

Change of Headquarters during the period of suspension - procedure regarding

Government of Maharashtra
General Administration Department,
Govt.Circular no.CDR-1008/C.R.2 /08/11,
Mantralaya, Mumbai 400 032.
Date : 19 March, 2008

Circular :-

A question whether an authority competent to order the suspension of an official can change his headquarters during the period of suspension was under consideration of the Government. The matter has been examined and the conclusions reached are stated in the following paragraph.

2. An officer under suspension is regarded as subject to all other conditions of service applicable generally to Government servants and cannot leave the station without prior permission. As such the headquarters of a Government servant should normally be assumed to be his last place of duty. However, where an individual under suspension requests for a change of headquarters, there is no objection to a competent authority changing the headquarters if it is satisfied that such a course will not put Government to any extra expenditure like grant of T.A.etc. or any other complication.

3. All Departments of the Mantralaya may bring the above to the notice of all concerned.

4. This Circular is made available on Government of Maharashtra website namely **www.maharashrata. gov.in** and the computer code number thereof is 20080319173245001.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(K.T.Satakar)
Under Secreatary to Govenrment of Maharashtra.

To

The Secretary to the Governor,
The Principal secretary to the Chief Minister,

The secretary to the Deputy Chief Minister,
The Chief Secretary to Government,
All Additional Chief Secretary / All Principal Secretary /
All Secretary to Government
All other Head of Departments and Heads of Offices under the Several Departments of Mantralaya,
All Divisional Commissioners,
All District Collectors,
Select file.